मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-07-11 | Page- 2
epaper.mahamtb.con

# कर्वे संस्थेत सायबर सुरक्षा वृक्षद्वारे वृद्धांचा सन्मान

**पुणे, दि. १० : प्रतिनिधी**

'क्लिक हील फाऊंडेशन'च्या अंतर्गत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रकल्पावर आधारित एक उपप्रकल्प येथील कर्वेनगरातील शहीद मेजर प्रदीप ताथवडे उद्यानात राबवण्यात आला. या प्रकल्पात के.बी.जे. आयआयटीच्या शिक्षिका मनाली सपकाळ व २० निवडलेल्या विद्यार्थिनी (सायबर वॉरियर्स) उपस्थित होत्या. या उपप्रकल्पात विद्यार्थिनींनी सायबर फसवणूक, ओटीपी सुरक्षितता, बनावट कॉल्स व डिजिटल व्यवहारातील सावधगिरी याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते 'सायबर सुरक्षा वृक्ष' यावर वृद्धांनी व आणि विद्यार्थिनींनी मिळून सायबर सुरक्षिततेसंबंधी संदेश दिला. 'ओटीपी कोणालाही सांगू नका', 'अनोळखी लिंकवर क्लिक करू नका', 'पासवर्ड जपा' या अशा विविध संदेशांनी सजलेले हे वृक्ष विद्यार्थिनींमध्ये सायबर सजगतेचे प्रतीक बनले. या उपप्रकल्पाचा मुख्य उद्देश बालवयीन ते वृद्ध व्यक्तींच्या सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता पसरवणे हा आहे. या उपप्रकल्पावेळी तेथील उपस्थित असलेल्या प्रेक्षकांनी अभिप्राय दिले. 'सायबर गुरूचे ऐका, सुरक्षित राहा' या ब्रीदवाक्याच्या जयघोषात हा उपप्रकल्प पार पडला.

Powered by Bharati Web